‘लातूर जिल्ह्यातील ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अध्ययन’

स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिक शास्त्रे विद्याशाखे अंतर्गत विद्यावाचस्पती (पीएच्. डी.)

या ‘समाजशास्त्र’ विषयातील पदवीकरिता संशोधन आराखडा

(Synopsis)

संशोधक

प्रा. सौ. गिरी माधुरी गोविंद

एम.ए.एम.एड्. एम.फील, सेट (समाजशास्त्र)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. घायाळ एस. पी.

(एम.ए., सेट. पीएच. डी.)

पदवी व पदव्युत्तर विभाग

(समाजशास्त्र विभाग प्रमुख)

स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद

ता. अहमदपूर जि. लातूर

इ.स.-२०१९

प्रस्तावना :-

समाजाच्या हिताकरीता व्यक्तीच्या सुप्त इच्छा, ध्येय व ते साध्य करण्याच्या मार्गावर मुरड घालण्याची आवश्यकता असते. त्यामुळे व्यक्तीवर नियंत्रण येते रुढी परंपरा, नीतिमुल्य आदर्श लोकाचार, प्रमाणके इत्यादी अनेक शक्ती व्यक्तीवर नियंत्रण ठेवीत असतात. या सर्व सामाजिक शक्तीचा असा प्रभाव आहे की, समाजातील सर्व व्यक्ती एकाच नियमांच्या चौकटीत बसतात व सर्वसामान्य पद्धतीचे वर्तन करतात. त्या सर्व शक्तीचा समावेश सामाजिक नियंत्रणात होतो. समाजाचा विकास स्थैर्य व अस्तित्व या तिनही बाबी व्यक्तीमधील संबंधाची स्थिरता व अस्तित्व यावरच अवलंबुन असतात. मानव हा समाजशील प्राणी आहे. समाजाशिवाय राहुच शकत नाही. त्यामुळे त्यांचे जीवन समाजाद्वारेच नियंत्रित केले जाते. त्यामुळे समाजामध्ये अशी व्यवस्था आहे की, मानवाचे जीवन जन्मापासून ते मरेपर्यंत नियंत्रित होत राहते. मुल लहान असताना आई-वडील व कुटूंबाच्या इतर सदस्यांच्या नियंत्रणात असते. थोडे मोठे झाल्यावर शिक्षक व शिक्षण संस्थांचे नियंत्रण असते. प्रौढ जीवनामध्ये देशाचे नागरिक असल्यामुळे त्या देशातील कायदे यांचे नियंत्रण राहते. व्यक्तीच्या वृत्ती, प्रवृत्ती या समाजासाठी काही प्रमाणात फायदेशीर असतात तर काही प्रमाणात हानीकारक असतात. फायदेशीर प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. परंतु हानिकारक प्रवृत्तीवर समाज नियंत्रण ठेवतो. याचा अर्थ सामाजिक नियंत्रण हे केवळ नकारात्मक आहे असा नाही. त्याचे कार्य फक्त समाजातील वाईट प्रवृत्ती थांबविणे एवढेच नाही तर सामाजिक नियंत्रण हे अशी परिस्थिती निर्माण करते की, ज्यातून सामाजिकरण व्हावे व व्यक्तीने समाजविरोधी कुठलेही कार्य करण्यास धजावू नये.

अशाच प्रकारचा नियंत्रणाचा एक महत्वाचा घटक ग्रामीण समाजामध्ये आढळून येतो. व तो म्हणजे पोलीस पाटील या घटकाला ग्रामीण जीवनामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. पोलीस पाटील यांना मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे व आजपर्यंत पोलीस पाटलाने ग्रामीण

समाजव्यवस्थेमध्ये आपला ठसा उमटवलेला आहे. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम १९६७ चा अधिनियम क्रमांक ८६ अन्वये पोलीस पाटील गावपातळीवर कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशान्वये कार्य करीत असतात. त्यामध्ये कार्यकारी दंडाधिकारी गावपातळीवरील जी माहिती व पत्रके मागवतील ती पुरवणे गावातील अपराधांचे प्रमाण व समाजस्वास्थ्य याबाबत माहिती पुरविणे, गावच्या हद्दीत गुन्हा घडु नये व लोकांना उपद्रव होवू नये म्हणून बंदोबस्त करणे व आपल्या हद्दीतील गुन्हेगारांचा शोध घेवून न्यायालयासमोर हजर करण्यास मदत करणे इत्यादी कामे पोलीस पाटील करतात.

पोलीस पाटलांची पार्श्वभूमी थोडक्यात सांगावयाची झाली तर प्राचीन काळापासून गावाचा कारभार सांभाळण्यासाठी गावप्रमुखाची महत्वाची भूमिका असायची त्या भूमिकेतील व्यक्त कायदा व सुव्यवस्था राखण्याबरोबरच सामाजिक समस्या सोडविण्यातही सहभागी असायचे. महाराष्ट्रातील शिवरायांच्या काळात गावपातळीवर मुख्य व्यक्ती म्हणून पाटील हे पद अस्तित्वात होते. या पदावर सहसा कर्तृत्ववान, शुर, धाडसी व्यक्तीच असायची. गावगाडा चालवत असताना न्यायपूर्वक वर्तणूकीमुळे अनेक पाटील हे इतिहासात अमर झाले.

संशोधनाचे महत्व व गरज :

प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्ह्यातील समाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलाची भूमिका हा विषय अध्ययनासाठी घेतला आहे. समाजामध्ये शांतता व सुव्यवस्था राखणे, तसेच शारीरिक व मानसिक त्रास होवू नये यासंबंधी सुयोग्य नियोजन करणे, नागरिकांमध्ये भयमुक्त वातावरण निर्माण व्हावे, पोलीस यंत्रणा सक्षम राहावी यासाठी जनता व पोलीस यामधील पोलीस पाटील हा अत्यंत महत्वाचा दुवा आहे. पोलीस पाटील म्हणजे आमचा कान आणि डोळा आहे. पोलीस पाटील म्हणजे त्यांच्यामुळेच गावातील खऱ्या गुन्ह्याची उकल होते. असे पोलीस सांगतात. कायदा व सुव्यवस्था जातीय सलोखा राखण्याच्या दृष्टिने गावातील घडणाऱ्या सर्व घटना यांचा

समन्वय साधण्याकरीता पोलीस पाटलाच्या कार्याचा व भूमिकेचा इतिहास समाजपटलावर यावा या हेतूने या विषयाची आवश्यकता वाटली. सामाजिक नियंत्रणाच्या प्रमुख साधनामध्ये खालील घटकांचा समावेश होतो. कुटूंब, शिक्षण, धर्म, कायदा लोकमत रुढी, परंपरा, प्रथा, आचार-विचार, विश्वास राज्य नेतृत्व, कला, प्रचार, हास्यव्यंग पुरस्कार आणि देश अहिंसा इ. साधनांचा उल्लेख होतो. अशाच प्रकारच्या नियंत्रणाचा एक महत्वाचा घटक ग्रामीण समाजामध्ये आढळून येतो व तो म्हणजे पोलीस पाटील. या घटकाला ग्रामीण जीवनात अनन्यसाधारण महत्व आहे. पोलीस पाटलाचे मुख्य कार्य म्हणजे गावात धार्मिक सलोखा राखणे, जातीय सलोखा राखणे यासाठी पोलीस प्रयत्नशील असतात. गावातील सदस्यांच्या काही अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे म्हणून गावच्या पातळीवर पोलीस पाटील एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे आलेला आहे.

१) या संशोधनामुळे लातूर जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या कार्याविषयी माहिती समजावून घेता येईल.

२) शासन, पोलीस प्रशासन, योजना व कार्यक्रम तयार करणारे अधिकारी यांना संशोधन समजण्यास महत्वपूर्ण होणार आहे.

३) पोलीस पाटील या अध्ययन विषयाची पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी इतर अभ्यासकांना मार्गदर्शक होईल.

४) भविष्यात संशोधन करणाऱ्या संशोधकालाव अभ्यासकाला हे संशोधन मार्गदर्शक ठरणार आहे.

उद्दीष्ट्ये :

१) ग्रामीण सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२) कौटूंबिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

३) पोलीस स्टेशन व गावातील लोक यांच्यातील समन्वयक म्हणून भूमिका तपासणे.

४) पोलीस यंत्रणेसाठी पोलीस पाटलांचे योगदानाचे महत्व अभ्यासणे.

५) पोलीस पाटलांना ग्रामीण समाजात नियंत्रणात येणाऱ्या समस्या व त्यावरील निर्मुलनाचे अध्ययन करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :

१) ग्रामीण सामाजिक नियंत्रणामध्ये पोलीस पाटलांची भूमिका निर्णायक आहे.

२) वर्तमानकाळात पोलीस पाटलांच्या भूमिका, दर्जा व अधिकारात बदल आहे.

३) पोलीस पाटलांना ग्रामीण, सामाजिक नियंत्रणात विविध समस्या येतात आणि या समस्यांवर उपाययोजना मांडणे गरजेचे आहे.

४) पोलीस पाटील संयुक्त कुटूंब पद्धतीत राहात असून सुशिक्षित असलेले दिसून येतात.

५) सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलाची भूमिका महत्वाची राहीलेली आहे.

६) पोलीस स्टेशन व गावातील लोक यांच्यातील समन्वय महणून दुवा म्हणून काम करतात.

७) पोलीस यंत्रणेसाठी पोलीस पाटलांचे सामाजिक नियंत्रणासाठी योगदान महत्वाचे राहिलेले आहे.

८) सामाजिक नियंत्रणासाठी गावातील लोकांच्या दृष्टिने पोलीस पाटलांचे महत्व विशेष आहे.

नमुना निवड पद्धती :

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा लातूर जिल्ह्यातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन असल्यामुळे लातूर जिल्ह्यातील १० तालुक्यांमधून ५० पोलीस, २०० सर्वसामान्य जनता व २०० पोलीस पाटील यांची निवड केली जाणार आहे. यामध्ये संभाव्य व असंभाव्य नमुना निवड पद्धतीचाही उपयोग केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाद्वारे लातूर जिल्ह्यातील ग्रामीण, सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलांची

भूमिका एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाचे संशोधन केले जाणार आहे. हे संशोधन ग्रामीण भागातील पोलीस पाटलांच्या कार्याविषयीच मर्यादित आहे. लातूर जिल्ह्यातील एकूण १० तालुके त्यातून ५० पोलीस, २०० सामान्य गावकरी व २०० पोलीस पाटील असे उत्तरदाते निवडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती घेण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील संबंधित घटक आणि पोलीस पाटलांची सामाजिक नियंत्रणात भूमिका ही संशोधनाची व्याप्ती आहे.

संबंधित साहित्याचा आढावा :

प्रस्तुत संशोधनाचा विषय हा लातूर जिल्ह्यातील ग्रामीण नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका : एक समाजशास्त्रीय अभ्यास या विषयाच्या अनुषंगाने अनेक विचारवंताच्या अभ्यासकांच्या संबंधित साहित्याचा अभ्यास केलेला आहे.

१) डॉ. सुधा काळदाते व डॉ. शुभांगी गोरे :

यांनी भारतातील गुन्हेगारी समाजशास्त्र या ग्रंथाचे प्रकाशन करुन त्यांनी समाजव्यवस्थेतील गुन्हेगारीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पोलीसांच्या भूमिकेत सविस्तर त्यांच्या कर्तृत्वाची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला आहे.

२) डॉ. नारायण बोराडे : यांनी सामाजिक नियंत्रणात पोलासींची भूमिका या विषयावर संशोधन केले आहे. त्यामध्ये पोलीस या शब्दाची उत्पत्ती सांगून पोलीस ही संकल्पना स्पष्ट केली आहे. प्राचीन, मध्ययुगीन, आदी आधूनिक काळातील पोलीस प्रशासनाचा विकास सांगितला आहे. शास्त्रीय पद्धतीने त्यांनी मांडणी केली आहे.

३) रितेश कुमार : विशेष पोलीस निरीक्षक यांनी जालना जिल्ह्याच्या संदर्भात पोलीस पाटील मार्गदर्शिका हे पुस्तक काढले आहे. या पुस्तकामध्ये पोलीस पाटलांविषयक कायदे आणि पोलीस पोटलांनी करावयाची कर्तव्ये तसेच जिल्ह्यातील पोलीस पाटलांच्या याद्या, त्यांचे

मोबाईल नंबर अशा सर्वच बाबी प्रकाशित केलेल्या आहेत. पोलीस पाटलांना मार्गदर्शक ठरावे या हेतूनेच या पुस्तकाची निर्मिती केलेली आहे.

४) डॉ. एम. बी. चांदे : यांनी भारतातील पोलीस या ग्रंथामध्ये पोलीस प्रशासनाचा ऐतिहासिक आढावा घेवून भारतातील पोलीस दलासंबंधीची शास्त्रीय माहिती स्पष्ट केली आहे.

५) कैलास धोंडिबा ढगे : यांनी कायदा व सुव्यवस्थेत पोलीस प्रशासनाची भूमिका या विषयावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे एम. फीलचा लघु शोधप्रबंध सादर केलेला आहे. यामध्ये त्यांनी मुंबई पोलीस अधिनियम पोलीस शक्ती त्यांचे निष्कर्ष व पोलीस प्रशासनाच्या भूमिकेत वस्तुनिष्ठपणे मांडणी केली आहे.

६) डॉ. बाळासाहेब पिंपळे : यांनी महाराष्ट्रातील पोलीस प्रशासन या विषयावर संशोधन केले आहे. त्यांनी संशोधन करीत असताना पोलीस प्रशासनाची ऐतिहासिक पार्श्वभूमी मांडली आहे. पोलीस प्रसासनाचा विकास, पोलीस, पोलीस प्रशासनाची संरचना पोलीस भरती, पोलीस प्रशासन केंद्रे यांची शास्त्रीय पद्धतीने मांडणी केली आहे.

संशोधन पद्धती :

ग्रामीण सामाजिक नियंत्रणात एखाद्या विषयाचे ज्ञान क्रमबद्ध अर्थातच व्यवस्थितरित्या मिळवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीच्या आधारे काढलेले निष्कर्ष शास्त्राला मान्य असतात. संशोधनाविषयीची सत्यता व वस्तुनिष्ठता तपासण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर केला जाणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी शास्त्रीय पद्धतीचा वापर करताना जसे की, प्राथमिक व दुय्यम तथ्य सर्वेक्षण,संशोधन आराखडा इत्यादीचा वापर केला जाणार आहे.

संशोधन आराखडा :

लातूर जिल्ह्यातील सामाजिक नियंत्रण व्यवस्थेत पोलीस पाटलांची भूमिका एक समाजशास्त्रीय अध्ययन या संशोधन विषयाच्या अभ्यासाकरीता अन्वेषणात्मक संशोधन आराखडा

वर्णनात्मक संशोधन आराखडा या दोन्ही संशोधन आराखड्याच्या संयूक्तरीत्या वापर अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याच्या आधारे संशोधन विषयाच्या संबंधित ज्या काही समस्या आहेत त्यांच्या कारणाचा बोध घेता येतो. वर्णनात्मक संशोधन आराखड्यामुळे संशोधन विषयाच्या वास्तविकतेचे व वस्तुनिष्ठतेचे वर्णन करता येते. हे संशोधन लवचिक असल्यामुळे वेळोवेळी याच्यात बदल करण्यात येतील.

तथ्य संकलन :

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व द्वितीयक अशा दोन्ही साधनांचा उपयोग केला जाणार आहे. तथ्य संकलनासाठी प्राथमिक तथ्य तंत्रातील निरीक्षण, मुलाखती अनुसूची या तंत्राचा उपयोग केला जाईल. या तंत्राच्या साह्याने नमुन्यातील स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक, कौटूंबिक स्थितीच्या संदर्भात माहिती संकलीत केली जाते. द्वितीय स्त्रोतामध्ये प्रकाशित, अप्रकाशित साहित्याचा समावेश होतो. संबंधित विषयाच्या अभ्यासाकरीता द्वितीय तथ्य संकलन स्त्रोतांच्या आधारे विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, आत्मकथने स्वैच्छिक संघटनांचे अहवाल प्रकाशित व अप्रकाशित संशोधन प्रबंध इत्यादीचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :

प्रस्तुत संशोधन विषयाशी संबंधित माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक तथ्य तंत्रातील निरीक्षण, मुलाखती, अनुसूची या तंत्राचा उपयोग केला जातो. या तंत्राच्या साह्याने नमुन्यातील स्त्री-पुरुष यांच्या सामाजिक, कौटूंबिक, आर्थिक, वैवाहिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय स्थितीच्या संदर्भात माहिती संकलित केली जाईल.

द्वितीयक स्त्रोत :

द्वितीयक स्त्रोतामध्ये प्रकाशित साहित्याचा समावेश होतो. संबंधित संशोधन विषयाच्या अभ्यासाकरीता द्वितीय तथ्य संकलन स्त्रोताच्या आधारे विविध संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्रे, आत्मकथने,

सरकारचे प्रकाशित अहवाल, मासिके, दैनिके, पाक्षिके, नियतकालिके, स्वैच्छिक संघटनाचे अहवाल प्रकाशित व अप्रकाशित संशोधन प्रबंध इत्यादीचा वापर केला जाईल.

तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन :

संशोधकाला तथ्याच्या वर्गीकरणानंतर संकलित तथ्यांचे विश्लेषण व निर्वचन करावे लागते. हा संशोधनातील महत्वाचा पाया आहे. मुलाखत अनुसूचीच्या आधारे तथ्य संकलीत केल्यानंतर त्यांचे सांकेतिकरण करण्यात येईल.

प्रकरणाची मांडणी :

प्रकरण १ ले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये सामाजिक नियंत्रणातून महत्वाच्या घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे. सामाजिक व्यवस्था पाटील या शब्दाचा अर्थ पोलीस या शब्दाचा अर्थ प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक कालखंडातील पाटलांचे स्थान तसेच पोलीस रचना व सामाजिक नियंत्रणातील पोलीस पाटलांची भूमिका इत्यादीची क्रमवार पद्धतीने मांडणी प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण २ रे संशोधन पद्धती व संबंधित साहित्याचा आढावा :

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाची प्रस्तावना मांडून संशोधन क्षेत्राचे अध्ययन करण्यात येणार आह. त्याच प्रमाणे लातूर जिल्ह्याची निवड करुन जिल्ह्याच्या संदर्भातील सर्वसाधारण माहिती जिल्ह्याचे क्षेत्रफळ व प्रशासन विभाग, लातूर जिल्ह्याचा नकाशा, लातूर जिल्ह्याची लोकसंख्या, त्यांचे साक्षरतेचे प्रमाण, जिल्ह्यातील पोलीस ठाणे, गुन्ह्याचे स्वरुप, न्यायालयीन माहिती इत्यादी बाबत अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच संशोधनाचा विषय, विषयाची आवश्यकता, उद्दिष्ट्ये, गृहितकृत्ये, तथ्यसंकलन, संशोधन विषयाची व्याप्ती, मर्यादा, पृथःकरण, संशोधनाचा आराखडा इत्यादी बाबीचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ३ रे पोलीस पाटलांची कौटूंबिक शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामीण व शहरी भागातील पोलीस पाटलांच्या कौटूंबिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात पोलीस पाटलांच्या भूमिकेचे विवेचन करण्यात येणार आहे. अधिकाराचा आढावा घेण्यात येणार आहे. तसेच पोलीस, पोलीस पाटील, सामान्य जनता यांच्या भूमिकेचे अध्ययन तसेच पोलीस पाटलांची सामाजिक नियंत्रणातील भूमिका इत्यादी बाबीचा प्रस्तुत प्रकरणामध्ये अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ४ थे सामाजिक नियंत्रणात पोलीस पाटलाची भूमिका :

प्रस्तुत प्रकरणामध्ये पोलीस पाटलांच्या भूमिकेविषयी व कार्य पद्धतीविषयी प्रस्तावना मांडून स्वातंत्र्यपूर्व काळात आणि वर्तमानकाळातील बदलाचे अध्ययन करण्यात येणार आहे. तसेच तथ्य संकलनासाठी जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता, पोलीस, पोलीस पाटील यांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. पोलीस पाटलांची भूमिका व कार्य पद्धती यांचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे. तसेच पोलीस पाटील व पोलीस यंत्रणा व गावकरी यांच्यातील संबंधाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण ५ वे निष्कर्ष व शिफारशी :

संशोधन प्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये प्रश्नावली व मुलाखतीच्या साह्याने संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे निष्कर्ष काढले जातील व त्याच अनुषंगाने काही शिफारशी केल्या जातील.

संदर्भ ग्रंथ सूची :

१) व. शं. जोशी : (२०११-१२) - महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम १९६७, रमा जाधव.

२) प्रतिभा अहिरे (१९९७) – ग्रामीण समाज शाळा, कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.

३) चांदे एस. बी. (२००८) - भारतातील पोलीस, सुमती पब्लिकेशन

४) घाटोळे रा. ना. (१९९२) - समाजशास्त्र तत्वे आणि पद्धती, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) आगलावे प्रदिप (२००७) - सामाजिक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन, सुधारित आवृत्ती.

६) कुलकर्णी चारुशिला – पोलीस पाटील यांची भूमिका महत्वपूर्ण (लोकसत्ता वृत्तपत्र) नाशिक ३ जानेवारी २०१४.

७) कुलकर्णी एस. बी., खणके विष्णू (२०१६) - महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, अशोक ग्रोवर अँड कंपनी, लॉ बुक सेलर्स अँड पब्लिशर्स, पुणे.

८) काळदाते सुधा, गोटे, गव्हाणे (२००६) – गुन्हेगारीचे समाजशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

९) ॲड. भिकाजी पाटील – पोलीस पाटील मार्गदर्शिका, (२०१४)

१०) डॉ. नारायण बाराडे (२००१) सामाजिक नियंत्रणात पोलीसांची भूमिका.

११) विठ्ठल एन. जाधव (२००१) पोलीस अधिक्षक परभणी, पोलीस पाटील मार्गदर्शिका.

१२) मुळे कमला, विश्वनाथ जोशी, वसंत देशपांडे (१९७६), (संपा.) भारतीय खेडी व जाती विचार प्रकाशन, औरंगाबाद.

१३) डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस अधिक्षक, लातूर. (निर्भया) महिला संबंधीचे कायदे व अधिनियम.

१४) बिज्र मोहन वर्मा (१९६२), भारतीय पोलीस, न्यु पब्लिकेशन, नवी दिल्ली.

१५) दैनिक सकाळ, करिअर मंत्र, ११/०४/२०१८.

१६) व्ही. एन. स्वामी (१९९८), पोलीस पाटील भरती संपूर्ण मार्गदर्शक, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

सैद्धान्तिक दृष्टिकोन

प्रस्तुत संशोधन विषयाला अनुसरुन सामाजिक नियंत्रण याबाबत फेअर चाईल्ड, मॅकआयव्हर, वॉलेस आणि वॉलेस, डरखाईम यांनी सामाजिक नियंत्रणातील महत्वाच्या घटकासंबंधीचा मांडलेला सिद्धांत सदर संशोधन विषयासाठी सैद्धांतिक दृष्टिकोण म्हणून उपयोगात आला आहे. फेअरचाईल्ड या समाजशास्त्रीय विचारवंताने डिक्सनरी ऑफ सोसीओलॉजी या ग्रंथामध्ये सामाजिक नियंत्रणासंदर्भात मांडलेल्या सिद्धांतानुसार त्यांनी समाजातील घटकांवर भर दिला आहे. ते म्हणतात, ''समाज अगर समाजातील कोणताही उपविभाग आपल्या घटकांकडून, ते घटक व्यक्ती असो वा समूह आपल्या अपेक्षांना अनुसरुन असे वर्तन ज्या प्रक्रियेद्वारे घडवून आणतो त्या प्रक्रियांच्या समुदायाला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात.'' तसेच मॅकआयव्हर आणि पेज या समाजशास्त्रीय विचारवंताने सामाजिक नियंत्रण अशी पद्धती आहे की, जिच्याद्वारे संपूर्ण सामाजिक व्यवस्थेत ऐक्य व स्थाईत्व टिकून रहावे अथवा बदलत्या संतुलनाच्या रुपात क्रियाशील राहणारी ती समग्र व्यवस्थेतील एक पद्धत आहे. सामाजिक नियंत्रण विषयी पुढील दृष्टिकोण मांडणारे वॉलेस आणि वॉलेस या समाजशास्त्रीय विचारवंतांनी सामाजिक नियंत्रणविषयक मत मांडतांना असे म्हटले आहे की, ज्या साधनाद्वारे समाजाचे सभासद समाजाची नियमने असावीत म्हणून एकमेकांना उद्युक्त करण्याचा प्रयत्न करतात त्याला सामाजिक नियंत्रण म्हणतात.

समाजातील विविध घटकांमध्ये सुसंवाद निर्माण होऊन सामाजिक नियंत्रणामुळे समाजाचा समतोल राखला जातो. समाजातील नियमांमुळे समाजात होणारे वाद-विवाद टाळले जातात. समाजामध्ये सुखशांत निर्माण करण्यासाठी सामाजिक नियंत्रण महत्वाचे आहे. समाजशास्त्रीय विचारवंत डरखाईमच्या मते, स्वार्थ जपत असतांना व्यक्तीला निश्चित व योग्य रितीने वर्तन करावयास लावण्याचे सामर्थ्य या शक्तीत आहे. ही शक्ती व्यक्तीत निर्णाण करणाऱ्या संस्था

समाजात आहेत. यामध्ये कुटूंब संस्था, धर्मसंस्था, सामाजिक नियंत्रणाचा महत्वाचे व आवश्यक माध्यमे ठरतात. सामाजिक नियंत्रणाचा दृष्टिकोण प्रामुख्याने संस्थात्मक स्वरुपाचा आहे. समाजामध्ये सातत्य टिकवण्यासाठी व्यक्ती वर्तनाचचे नियमन करणारी व्यवस्था दोन प्रकारची आहे. यामध्ये १) बळाचा वापर उदा.-पोलीस, न्यायालय २) वर्तनाचे नियंत्रण यामध्ये रुढी, परंपरा, धर्म इत्यादी बाबींचा समावेश होतो.

वरील दोन प्रकारामुळे सामाजिक ताण-तणाव संघर्ष दूर होतात. म्हणून सामाजिक नियंत्रण प्रक्रियेत रुढी, परंपरा, जनमत, कायदा, धर्म, नितीमूल्ये, शिक्षण, कुटूंब, राजकीय व धार्मिक संघटना यांचा महत्वपूर्ण संबंध असतो. बळाचा वापर व वर्तनाचे नियम या दोन्ही प्रकारचे वर्णन एक समाजाचा अपरिहार्य भाग असे केले जाते. सुसंवादित एक संघ व स्थार्या म्हणून सामाजिक नियंत्रणाकडे पाहिले जाते.

सामाजिक नियंत्रणातील पोलीस आणि जनता यातील महत्वाचा दुवा म्हणून पोलीस पाटलाकडे बघितले जाते. सध्या पोलीस पाटील हे पद महाराष्ट्र पोलीस कायदा १९३७ च्या आधिन असून या कायद्याप्रमाणे पोलीस पाटलांना गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याचे काम करावे लागते. प्राचीन काळातील ग्रामीण समाज व्यवस्थेतील प्रत्येक खेड्यातील प्रमुखास ग्रामणी, ग्रामाधिपती, ग्रामकुट, ग्रामभोजक व पट्टकीला असे म्हणत असत. सम्राट अशोक यांच्या काळामध्ये कापसाच्या विनलेल्या पट्ट गावकीच्या नोंदी लिहीण्याकरीता वापरत असत. जमीनीच्या मालकाच्या नोंदी या पट्टीवर करीत आणि ते पट्ट वेळूच्या नळीत घालून सुरक्षित ठेवित. या नळकांड्याला पट्टकील असे म्हणत. या शब्दावरुन पुढे पट्टकील, पटेलू, पटील, पाटील अशा क्रमाने या शब्दाचा उदय झाला.